# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


**जा.क्र.मनपा/आस्था/2889/2023-24** **दि.23/02/2024**

प्रति,

सिस्टिम मॅनेजर,

संगणक विभाग,

मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण, शिक्षण व आस्थापना विभागाकरीता सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी सेवा करारपध्दतीने घेणेबाबत...

संदर्भ :- 1. मा.आयुकत महोदय यांची दि 21/02/2024 रोजीची मंजूरी

2. जा.क्र.मनपा/आस्था/2889/2023-24, दि. 23/02/2024 रोजीची जाहीर सूचना.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण, शिक्षण व आस्थापना विभागाकरीता सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी सेवा करारपध्दतीने घेणेबाबत मा. आयुक्त महोदय यांनी दि.21/02/2024 रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण, शिक्षण व आस्थापना विभागाकरीता सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी सेवा करारपध्दतीने घेणेबाबतची जाहिर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहीर सूचनेची प्रत

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/2889/2023-24 दि.23/02/2024

**शासनाकडील/महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी सेवाकरार पध्दतीने नियुक्त करणेबाबत.**

## // जाहीर सूचना //

आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका लेखापरीक्षण, शिक्षण व आस्थापना विभागासाठी शासनाकडील/महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून सेवाकरार पध्दतीने लेखापरीक्षण अधिकारी पदासाठी खालीलप्रमाणे कामकाजाचा अनुभव पूर्ण करणाऱ्या इच्छुक व पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतींचा एक संच व मूळ प्रमाणपत्रांसह मा. स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) जि. ठाणे - 401101 येथे दि. 01/03/2024 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी (Walk in Selection) उपस्थित राहावे.

याबाबतची जाहीर सूचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलबध् करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | पदाचे नाव | पद संख्या | कामकाजाचा अनुभव |
|---|---|---|---|
| 1. | लेखापरीक्षण अधिकारी (सेवा करार पध्दतीने) | 09 | शासनाकडील/महानगरपालिकेतील लेखा अथवा लेखापरीक्षण सेवेतील वर्ग-1/सहा.लेखाधिकारी/सहा.लेखापरीक्षा अधिकारी/लेखाधिकारी या पदावरील किमान 05 वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक. |

**अटी व शर्ती-**

1) उमेदवार शासनाकडील/महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त झालेला असावा.
2) सा.प्र.वि शासन निर्णय क्र. संकिर्ण-2715/प्र.क्र.100/13 दि.17/12/2016 तसेच शासन निर्णय क्र. संकिर्ण-2715/प्र.क्र.100(भाग-1)/13 दि.08/09/2023 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
3) सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी यांची मासिक पारिश्रमिक व भत्ते दि.08/09/2023 रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात येईल. एकदा निश्चित केलेल्या वेतनामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.

4) करार पध्दतीने नेमणुकीकरीता अर्ज करते वेळी सेवानिवृत्त अधिका-याचे वय 65 वर्षा पेक्षा अधिक नसावे.

5) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त 01 वर्षासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नुतनीकरण करता येईल. परंतु एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

6) उमेदवार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

7) उमेदवाराने मुलाखतीस येताना सेवानिवृत्त आदेशाची छायांकित प्रत व कामकाजाचे अनुभव, राहण्याचा संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा.

8) नियुक्तीच्या कालावधीमध्ये सोपविलेले लेखापरीक्षणासाठी काम पुर्ण करुन लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याची जवाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

9) सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवाराला रु.100/- स्टॅम्पपेपरवर हमी देणे बंधनकारक राहील.

10)करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात/ मनपामध्ये सेवा समावेशनाबाबत / सामावुन घेण्याबाबतचा अधिकार/ हक्क नसेल.

11)करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याविरुदध विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा चालु प्रस्तावित नसावी किवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

12)नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परीस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

13)आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

14)प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रीया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका